नि.दि.दावा क्र. ५६/२०१६ निशाणी क्र. ९४ खाली

**<u>वादी तर्फे साक्षीदाराचा उलटतपास वकील श्री. व्ही. बी. शिंदे यांचे मार्फत शपथेवर पुन्हा सुरु–</u>**

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नावाने आता जमीन नाही. गट क्र. १७८ मधील जमीन माझ्या नावाने नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जमीन विक्री केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी भागवत नरहरी शिंदे यांना जमीन विकलेली आहे.

दस्तऐवज यादी नि. क्र ९७ सोबत वादीतर्फे प्रतिवादी क्र. ४ व प्रतिवादी क्र. ८ यांचे दरम्यान झालेले दस्तऐवज दाखवण्यात आले. मुळ नोंदणीकृत दस्त असल्याने त्यास अनुक्रमे नि क्र. ९८ व ९९ देणेत आले.

प्रश्न – तुम्ही भागवत नरहरी शिंदे यांना जमीन विकली ?

उत्तर– भागवत नरहरी शिंदे यांनी माझेकडुन फसवणुक करुन विक्री करुन घेतली.

हे मला माहिती नाही की, भागवत नरहरी शिंदे यांनी सदरची जमीन वादीस विकली. हे म्हणणे खरे आहे की,फसवणुकीची तक्रार मी भागवत नरहरी शिंदे यांचेविरुध्द केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्याचा खर्च माझे आई, वडील, भाऊ व मी असे सगळे मिळुन खर्च करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.07.13 23:41:55 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–१४.०७.२०२६

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, परंडा